drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 07 Jan, 2025 - 08 Jan, 2025

### Total Mention 9

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 1 | N/A | N/A | 1 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 8 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Loksatta | Garbage disposal by June | Mumbai | 1 |

Loksatta • 08 Jan • Dharavi

## Garbage disposal by June

| 1 • PG | 1378 • Sqcm | 5407547 • AVE | 784.32K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# कचरा विल्हेवाट जूनपर्यंत

## मुलुंड क्षेपणभूमीसाठी ठेकेदाराला अंतिम मुदत

इंद्रायणी नार्वेकर, लोकसत्ता

**मुंबई** : मुलुंड कचराभूमीतील कचऱ्याच्या डोंगरांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावून जमीन पुनर्प्राप्त करण्यासाठीची मुदत जून २०२५ रोजी संपत आहे. आतापर्यंत या कचराभमीवरील केवळ ५० टक्के कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. उर्वरित कचऱ्याची विल्हेवाट येत्या सहा महिन्यांत लावावी लागणार असून त्यासाठी दरदिवशी १५ हजार मेट्रिक टन कचऱ्याच्या विल्हेवाटीचे उद्दिष्ट कंत्राटदाराला देण्यात आले आहे. कंत्राटाच्या मुदतीत कचरा विल्हेवाटीचे उद्दिष्ट गाठण्याचा इशारा पालिका प्रशासनाने कंत्राटदाराला दिला आहे.

पालिकेच्या क्षेपणभूमीची क्षमता संपत आल्यामुळे या क्षेपणभूमी शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे पालिकेने मुलुंड कचराभूमी बंद करण्याचे ठरवले आहे. मात्र प्रकल्पाचे काम धीम्यागतीने सुरू असल्यामुळे नुकतीच घनकचरा विभागाने कंत्राटदार व सल्लागाराची बैठक घेतली. या बैठकीत कंत्राटदाराला जून २०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याकरीता कंत्राटदाराला दरदिवशी १५ हजार मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे उद्दीष्ट्य देण्यात आले आहे. तसेच या कामासाठी अतिरिक्त यंत्रसामुग्री लावण्यासही सांगण्यात आले आहे.

या कचराभूमीवर गेल्या अनेक वर्षांपासून साठलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून जमीन पुनर्प्राप्त करण्यासाठी पालिकेने जून २०१८ मध्ये कंत्राटदार नेमून कार्यादेशही दिला होता. कार्यादेश दिल्यानंतरही बराच काळ या कचराभूमीवर कचरा स्वीकारला जात होता. विविध परवानग्यांमुळे प्रत्यक्ष प्रकल्प सुरू होण्यास विलंब झाला होता. त्यातच करोना व टाळेबंदीमुळे मनुष्यबळ नसल्यामुळे या प्रकल्पाच्या कामाला उशीर झाला होता. त्यामुळे तीन वर्षात या कामाने वेग घेतला नव्हता. टाळेबंदीनंतर प्रकल्पाच्या कामाला वेग आला. मात्र आतापर्यंत केवळ ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. या कचराभूमीवर एकूण ७० लाख टन कचरा आहे. त्यापैकी आतापर्यंत ३७ लाख मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. सध्या दर दिवशी साडे आठ ते नऊ हजार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. करोना आणि टाळेबंदीमुळे हा प्रकल्प रखडला होता. त्यामुळे सहा वर्षांच्या या प्रकल्पाला एक वर्षांची मुदत वाढवून दिली आहे. जून २०२५मध्ये या कामाची वाढीव मुदत संपत आहे.



### प्रकल्पातून मिळणारी जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पाला

कचरा विल्हेवाटीनंतर प्राप्त होणारी ४१.३६ एकर जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पाला देण्याची तयारी पालिका प्रशासनाने दर्शवली आहे. पालिका आयुक्तांनी तसे पत्रही नगरविकास विभागाला पाठवले असल्याची बाब माहिती अधिकारात उघड झाली होती.

### ७३१ कोटींचा खर्च

अनेक वर्षांपासून साठलेल्या ७० लाख टन कचऱ्यावर प्रक्रिया करून जमीन प्राप्त करण्याचे उद्दिष्ट आहे. मुलुंड कचराभूमी १९६८ मध्ये सुरू झाली होती. या कचराभूमीवर दररोज तब्बल १५०० मेट्रिक टन कचरा टाकला जात होता. गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढल्याने ही कचराभूमी (डम्पिंग ग्राऊंड) बंद करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यामुळे पुढील सहा वर्षांसाठी पालिकेने सुमारे ७३१ कोटी रुपये खर्च करून मुलुंड कचराभूमीवरील कचरा उचलण्याचे कंत्राट बायोमायनिंग इंडिया या कंपनीला २०१८ मध्ये दिले होते.

The deadline for scientifically disposing of waste at the Mulund landfill is June 2025. Only 50% of the 70 lakh tons of waste has been processed so far. The contractor must dispose of 15,000 metric tons per day to meet the target. The project was delayed due to COVID-19 and layoffs.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Hindustan Times | MCZMA nod for Marve-Manori bridge | 124.6M |
| 2. | Dailyhunt | Dharavi Redevelopment: Homes Promised For Eligible And One Lakh Ineligible Slum-... | 18.6M |
| 3. | ThePrint | Affordable housing, rental challenges discussed during pre-budget consultation: ... | 11.3M |
| 4. | India Herald | What did Eknath Shinde say about slum dwellers? Find out more: | 651.5K |
| 5. | Cliq India | Affordable housing, rental challenges discussed during pre-budget consultation: ... | N/A |
| 6. | News on Projects | Kapila Metals plans to set up a mild steel billets unit in Jalna. Unit | N/A |
| 7. | OB News | Affordable housing, rental challenges discussed during pre-budget consultation: ... | N/A |
| 8. | The Mobi World | Affordable housing, rental challenges discussed during pre-budget consultation: ... | N/A |